**<u>प्रेस नोट</u> <u>दिनांकः- १७/०६/२०१९</u>**

**<u>चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर</u>**

**पोलीस काका, भरोसा सेलच्या योजनेची माहीती दिले बाबत.**

दिनांक १७/०६/२०१९ रोजी वपोनि. कृष्णा इंदलकर, चंदननगर पो.स्टे. यांचे सुचनांनुसार पोलीस ठाणेकडील पोना. २६२३, अनिरुध्द जायभाये यांनी हद्यीतील निर्मला कॅन्व्हेंट स्कुल, पुणे येथे जावुन मिटींगमध्ये विद्यार्थी, शाळेचा स्टाफ यांना सुरक्षीततेसंबधाने, सायबर गुन्हे, लैंगीक अपराध, रॅगींग यासंबधाने चर्चा करुन मार्गदर्शन केले. त्यांना असलेल्या अडीअडचणीबाबत विचारणा करुन त्यांचे शंका व अडचणीचे निरसन केले. सदर मिटींग दरम्यान त्यांना पोलीस आयुक्तालयामध्ये मुलीसाठी स्थापन केलेल्या पोलीस काका, भरोसा सेलच्या योजनेची माहीती देवुन, योजनेचा उपयोग करुन घेणेसाठी मार्गदर्शन केले. महीलांसाठी १०९१ हेल्पलाईन नंबरबाबत माहीती देऊन त्यावर अडचणी कळविणेबाबत आवाहन केले. अडचणींचे दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं. ०२०/२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं. १०० वर संपर्क सांधुन मदत मागणेसाठी माहिती दिली. सदर ठिकाणी १५० ते २०० विदयार्थी हजर होते.

सदरची चांगली कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली पोना. अनिरुध्द जायभाय यांनी केलेली आहे. सदर मिटींगचे घेण्यात आलेले फोटो खालीलप्रमाणे:-

